# कोल्हापूर विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा ग्रंथपाल संघटना बैठकीचे इतिवृत्त दि.०५/०४/२०१८

| अ.क. | सर्वसाधारण विषय | करावयाच्या कार्यवाहीचा तपशील | कार्यवाही कोणत्या स्तरावर | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | मागील सभेचे प्रोसेडिंग वाचून कायम करणे | --- | -- | -- |
| २ | एकाकी पदाचे ग्रेड वेतन मिळावे. | धोरणात्मक बाब आहे. संघटनेने याबाबत शासनास निवेदन सादर करावे. | शासन स्तरावर/ संघटनास्तरावर | -- |
| ३ | पदवीधर वेतन श्रेणी फरक बीले तात्काळ मिळावीत. | वेतन पथक (माध्यमिक) यांनी याबाबत योग्य ती कार्यवाही करावी. | वेतन पथक स्तरवर | -- |
| ४ | शिक्षकाप्रमाणे किरकोळ १२ रजा मिळाव्यात यासाठी अर्जित रजा कमी करावी. | धोरणात्मक बाब आहे. | शासन स्तरावर | -- |
| ५ | ग्रंथपालांना दिपावळीची सुट्टी मिळावी. | धोरणात्मक बाब आहे. संघटनेने या कार्यालयास निवेदन दिल्यास ते वरिष्ठ स्तरावर सादर करण्यात येईल. | संघटनास्तरावर | -- |
| ६ | प्रत्येक जिल्ह्यात त्रैमासिक सभा वेळेवर व्हाव्यात. | शिक्षणाधिकारी यांनी संघटनांच्या सहविचार सभांचे दर तीन महिन्यात नियमित आयोजन करावे. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| ७ | ग्रंथमहोत्वस हा ग्रंथालय विभागापुरता मर्यादित असावा व ग्रंथमहोत्सवासाठी असलेली आर्थिक तरतूद व कार्यवाहीची माहिती मिळावी. | राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानामार्फत आयोजित ग्रंथमहोत्सवाचे ठिकाण फिरते ठेवावे. स्वतंत्र उपक्रम घ्यावा. अन्य उपक्रमात समाविष्ट करण्यात येऊ नये. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| ८ | प्रत्येक वर्षी ग्रंथ खेरेदीची सक्ती करावी व अंदाजपत्रकात त्याची नोंद करावी. | लोकसहभागातून, लोकवर्गणीतून अशा वेगवेगळया उपक्रमातून/देणगीतून पुस्तके खरेदीचे उपक्रम राबविण्यात यावे. | शाळास्तरावर/ संघटनास्तरावर | -- |
| ९ | श्री. अशोक गिरजू मोरे ग्रंथपाल श्री रामराव विद्यामंदीर, जत यांचे वैयक्तिक मान्यता प्रस्तावास मंजूरी मिळणेबाबत. | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. सांगली यांची कार्यवाही करावी. | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. सांगली | -- |
| १० | अर्धवेळ ग्रंथपालांना एस.एस.कोडप्रमाणे कामाचे साडेतीन तास ठरवून त्यांचे वेळापत्रक निश्चित करावे. | धोरणात्मक बाब आहे. संघटनेने या कार्यालयास निवेदन दिल्यास ते वरिष्ठ स्तरावर सादर करण्यात येईल. | शासन स्तरावर | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११ | अर्धवेळ ग्रंथपालाचे प्रोव्हिडंट फंड खाते जुन्या निकषाप्रमाणे सुरु करुन त्यांना नंबर मिळावेत. | धोरणात्मक बाब आहे. संघटनेने या कार्यालयास निवेदन दिल्यास ते वरिष्ठ स्तरावर सादर करण्यात येईल. | शासन स्तरावर | -- |
| १२ | कालबध्द पदोन्नतीचा लाभ अर्धवेळ ग्रंथपालांना मिळावा. | धोरणात्मक बाब आहे. संघटनेने या कार्यालयास निवेदन दिल्यास ते वरिष्ठ स्तरावर सादर करण्यात येईल. | शासन स्तरावर | -- |
| १३ | मोफत पाठ्यपुस्तके इ.९ वी व १० वी च्या विद्यार्थ्यांना मिळावीत. तसेच सर्व शिक्षाअभियाना अंतर्गत मिळणारी मोफत पाठ्यपुस्तके वेळेत मिळावीत. | संचालनालयाच्या परिपत्रकानुसार इ.९-१० वी साठी पुस्तक पेढी या योजनेअंतर्गत शाळेमध्ये असणाऱ्या पटसंख्येच्या अ.जा./अ.ज./इ.मा.व./वि.मा.प्र./वि.जा.भ.ज. या प्रवर्गातील एकूण विद्यार्थी संख्येच्या २५ टक्के विद्यार्थ्यांना पुस्तके वितरीत करण्यात येतात. सद्यस्थितीत इ.९-१० वी च्या विद्यार्थ्यांसाठी मोफत पाठ्यपुस्तक योजना नाही. इ.९-१० वी च्या विद्यार्थ्यांसाठी मोफत पाठ्यपुस्तक उपलब्ध करुन देणे ही धोरणात्मक बाब आहे. याबाबत संघटनेने राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, मुंबई यांचेकडे निवेदन सादर करावा.<br>इ.१ ते ८ वी साठी सर्व शिक्षा अभियानामार्फत पुरेशी पुस्तके मिळणण्याबाबत आवश्यक मागणी शिक्षणाधिकारी यांचेकडे करावी. शिक्षणाधिकारी यांनी प्राप्त पुस्तक संचाचे वेळेत वितरण करावे. | शाळा/शिक्षणाधिकारी/ संघटना स्तरावर | -- |

शिक्षण उपसंचालक
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर